**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २५५** **दिनांक :- १४/०९/२०२१**

## वाईन शॉपचे दुकानामध्ये चोरी करणा-या तीन आरोपीतांना अटक करून मुद्‌देमाल हस्तगत-नवघर पोलीस स्टेशनची कामगिरी.

दिनांक ०२.०९.२०२१ रोजीचे २२.०० वा. ते दि. ०३.०९.२०२१ रोजी सकाळी ०९.४५ वाजताचे दरम्यान फिर्यादी नामे श्री. संदिप बॅलिस्टर सिंग यांचे ‘भाईंदर वाईन शॉपचे’ कोणीतरी अज्ञात चोरटयाने पाठीमागील दरवाजा तोडुन आत प्रवेश करून वाईन शॉपचे काउंटरमध्ये ठेवलेली रोख रक्कम ०२.५३,८८२/- रु. तसेच वेगवेगळया कंपनीच्या दारुच्या ३५ बाटल्या असे एकुण ०३,७९,७७६/- रु. ची मालमत्ता घरफोडी चोरी केलेबाबत नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ६१७/२०२१ भा.दं.वि.सं कलम ३८०, ४५४, ४५७ प्रमाणे नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाची लवकरात लवकर उकल होण्याबाबत वरिष्ठांनी आदेश दिले होते. त्याअनुषंगाने नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळ व आजुबाजुचे परिसरातील पाहणी करून वेगवेगळया स्वरुपातील पुरावे प्राप्त केले होते. पडताळलेल्या पुराव्यांमध्ये सदरचा गुन्हा ३ आरोपीतांनी केला असल्याचे दिसून आले होते. प्राप्त पुरावे व माहितीच्या आधारे गुन्हयाचा कौशल्यपुर्ण व कसुन तपास करुन घरफोडी करणारे तिन्ही आरोपीतांना अवघ्या दोन दिवसांत अटक करुन रोख रक्कम, गुन्हयात वापरलेली ॲक्टीव्हा मोटार सायकल व दारुच्या बाटल्या असा एकुण ०२,५३,८८२/- रु. किं. चा मुद्‌देमाल हस्तगत केला असून गुन्हयाची उकल करुन उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. नमुद गुन्हयात अटक केलेल्या आरोपीतांपैकी एका आरोपीविरुध्द घरफोडी चोरीचे व इतर असे एकुण २० गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळुन आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोना/२९५६ ऐन्नोद्दीन शेख, पोशि/३४५८ संदिप जाधव,पोशि/२८३८ युनुस गिरगावकर, पोशि/०५०८९२ आमीतकुमार पाटील यांनी केली आहे.

--------------ooooo--------------